# मुंबई विद्यापीठ

**अत्यंत तातडीचे**

क्र.वि.नि.वि.वि/२३५/०५/२०१५,
मुंबई – ४०० ०३२,
२२ जुलै २०१५,

परिपत्रक:–

विषय :– सर्व संलग्नित अनुदानित महाविद्यालये मुल्यांकन व पुर्नमुल्यांकन करणेबाबत

संदर्भ :– १. शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०१०/२०/१०/ विशि–३ दि. ८ ऑक्टोबर २०१०

२. संचालनालयाचे पत्र क्र. संकीर्ण /२०१५/नॅक/ मवि–२–३/४५६ दि. १४.०१.२०१५

प्राचार्य, सर्व संलग्नित अनुदानित/विनाअनुदानित व कायम विना अनुदानित महाविद्यालये/संस्था यांना उपरोक्त विषयसदंर्भिय कळविण्यात येते की, सर्व महाविद्यालयांनी **नॅशनल ॲसेसमेंट व ॲक्रिडीटेशन कौंसिल (NAAC), बेंगलोर** यांचेकडून मुल्यांकन व पुर्नमुल्यांकन करून घेणे अनिवार्य असल्याचे विद्यापीठाने वेळोवेळी परिपत्रके काढून कळविले आहे.

सर्व पात्र अनुदानित/विनाअनुदानित व कायम विना अनुदानित महाविद्यालयांनी मुल्यांकनाचा प्रस्ताव नमुद सक्षम प्राधिकरणाकडे त्वरीत पाठविण्याची कार्यवाही करावी आणि तसे विद्यापीठास लेखी कळवावे.

जी महाविद्यालये/संस्था अशा प्रकारच्या मुल्यांकनाचा/पुर्नमुल्यांकनाचा प्रस्ताव सक्षम प्राधिकरणाकडे विहित मुदतीत पाठविणार नाहीत, अशा महाविद्यालयांच्या विरूध्द शासन निर्णयाप्रमाणे विद्यापीठामार्फत असंलग्निकरण, इ. बाबत कारवाई करण्यात येईल.

विद्यापीठ अनुदान आयोगाने त्यांची पब्लिक नोटिस क्र. एफ–२०–४/२००९/(आय.यु.सी) दि. २७ डिसेंबर २०१३ आणि क्र १–१/२०१४/(डी.सी) दि. २९ जानेवारी २०१५ अन्वये परिपत्रक निर्गमित केलेले असून त्यामध्ये UGC (Mandatory Assessment and Accreditation of Higher Educational Institutions) Regulations 2012 आणि त्यामधील कलम ७.१ लक्ष वेधण्यात येत असून ज्या संस्था /महाविद्यालये अशा प्रकारचे मुल्यांकन करणार नाहीत त्यांचे अनुदान खंडित करण्याचे संदर्भात सर्व विद्यापीठांना आवश्यक ती पुर्तता करण्याचे निर्देश सदर पब्लिक नोटिस द्वारे विद्यापीठ आयोगाने दिलेले आहेत.

....२/–

तरी सर्व संलग्नित अनुदानित/विनाअनुदानित व कायम विना अनुदानित महाविद्यालये/संस्था यांना कळविण्यात येते की, त्यांनी मुल्यांकन व पुर्नमुल्यांकनाचे प्रस्ताव लवकरात लवकर सक्षम प्राधिकरणाकडे पाठवावेत.

मुंबई – ४०० ०३२
२२ जुलै २०१५

डॉ. एम. ए. खान
कुलसचिव
मुंबई विद्यापीठ

प्रति,
प्राचार्य सर्व संलग्नित अनुदानित व विनाअनुदानित व कायम विना अनुदानित महाविद्यालये/संस्था यांचे माहिती व योग्य त्या कार्यवाहीकरिता रवाना